सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in    Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577    Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/ परिपत्रक /२०२६/2933

दिनांक :- 28/10/2026

प्रति,

प्राचार्य,
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,
अमरावती.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक प्रथम वर्ष पदवी /पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील राज्य CET कक्षाच्या व संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत पडताळणी करण्यात येणार आहे. पडताळणी करतांना सर्व साधारणपणे खालील कार्यपध्दती अवलंबविण्यात येणार आहे. सदर गुणवत्ता याद्या हया **शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कठोरा नाका, अमरावती** येथे सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार दिलेल्या तपासणी अधिकारी यांचेशी समन्वय साधुन उपस्थित राहून तपासून घेवून या **कार्यालयास दिनांक २७/११/२०२६ पर्यंत** सादर कराव्यात.

सादर केलेल्या गुणवत्ता याद्या यांची संस्थेतर्फे गुणवत्ता याद्या संस्थास्तरावर समिती नेमूण प्रथम तपासणी संस्थास्तरावर झालेली असल्याबाबतचे प्राचार्याचे पत्र व संबंधित तपासणी अधिकारी यांचा अहवाल सोबत जोडणे आवश्यक आहे.

संबधीत तपासणी अधिकाऱ्यांनी Government of Maharashtra State Common Entrance Test Cell Academic Year २०२६-२७ मधील संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची माहीती पुस्तिका मध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे तपासणी करण्यात यावी तसेच पडताळणी करतांना खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थाकडुन प्रथम वर्षाकरीता मुदतठेवीचा हप्ता मा. संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई व संस्था अध्यक्ष यांचे संयुक्त ठेव खात्यात जमा केले किंवा नाही, याची पडताळणी करावी. भरलेली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर प्रवेश यादी पडताळणीची कार्यवाही करावी. मुदत ठेव पावती संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण म.रा., मुंबई यांच्या संयुक्त नावाने असल्याची खात्री करुन त्यासबंधात संबंधित बँकेचे प्रमाणपत्र संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावे. तसेच सर्वच संस्थांनी मुदतठेव ठेवल्याबावतची तपासणी करुन गुणवत्ता यादीसोबत जोडण्यास कळवावे.

२) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये ज्या संस्थांना नविन अभ्यासक्रम सुरू असलेल्या अभ्यासक्रमामध्ये वाढ व नवीन संस्था सुरु करण्यास मंजुरी मिळालेली आहे अशा संस्थांनी या कार्यालयाची तपासणी शुल्क भरल्याबाबत कागदपत्रे, वाढीव अभ्यासक्रमाचे ठेव ठेवल्याची पावती व अंतिम मान्यता प्रमाणपत्रे इत्यादी तपासावे.

तपासणी अधिकारी यांचे उपलब्धतेबाबत संबंधित संस्थेच्या प्राचार्यांशी आपल्या स्तरावर संपर्क साधावा. यानंतर सादर केलेल्या गुणवत्ता याद्या कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाही, याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

१) प्रवेश यादी पडताळणीसाठी संस्थेच्या लॉगिनमध्ये राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने उपलब्ध करुन दिलेल्या संस्थेतील प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या यादीची प्रिन्टआऊट घेवून ती पडताळणीसाठी उपयोगात आणावी. पडताळणी केलेल्या प्रत्येक उमेदवाराच्या समोर प्रवेशासाठी Recommended अथवा Not Recommended (With Reason) असा अभिप्राय नमुद करावा.

२) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने दिनांक ८/१०/२०२० असाधारण राजपत्र क्रमांक २३५ व २०/८/२०२१ असाधारण राजपत्र क्रमांक २३९ अन्वये प्रसिध्द केलेली अर्हता तसेच पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या माहिती पुस्तीकेमध्ये नमुद केलेली अर्हता केवळ ग्राहय धरण्यात यावी.

३) संस्थेस नवीन संस्था/नवीन अभ्यासक्रम किंवा प्रवेश क्षमता बदलास मान्यता दिली असल्यास शासन निर्णयाची प्रत तसेच तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांच्या मान्यतेची प्रत सादर करावी.

४) सदर गुणवत्ता याद्या ह्या महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९ (५) च्या तरतूदीनुसार प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या तपासणी करण्यात येणार आहे.

५) गुणवत्ता याद्या तपासणी करतांना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश प्रक्रिया शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे.

६) प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर करतांना राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावरील संस्थेतील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे यादीची अद्ययावत (Latest printout) three प्रतीत सादर करावी. कोणत्याही परिस्थितीत Word व Excel मधील गुणवत्ता यादी सादर करण्यात येवू नये.

७) प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर करतांना संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्याचे जसे फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची परवानगी असल्याचे कागदपत्रे सादर करावे तसेच मा. तंत्रशिक्षण संचालनालयाचे मान्यतेचे पत्र सादर करावे.

८) ज्या संस्था नव्याने सुरु झाली असल्यास त्या संस्थेने प्रथम व व्दितीय वर्षाकरीता आवश्यक असलेली एफ.डी. भरणा केली किंवा नाही ते सादर करावे.

९) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ज्या संस्थांनी या कार्यालयामार्फत थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांचेकडून प्रवेश क्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यात आली असल्यास अशा संस्थांनी शासनास भरणा केलेली नोंदणी शुल्काची रकमेची पावती सादर करावी.

१०) संस्थास्तरावरील आणि केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या जागावरील (ACAP) प्रवेशाकरीता संस्थेने संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली जाहिरात, अर्ज मागविण्यासाठीचा कालावधी, प्राप्त अर्जाची गुणवत्ता यादी, विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी इत्यादी सादर करावे.

११) अभ्यासक्रमाच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करतांना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्राची संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी / संस्था प्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी केलेली असल्याचे प्रमाणपत्र सादर करावेत.

१२) गुणवत्ता यादी सादर करतांना शुल्क परताव्याबाबत आणि मुळ कागदपत्रे परताव्याबाबत संस्थेबद्दल काही तक्रार असल्यास सदर तक्रार निकाली निघाल्याबाबतचे कागदपत्रे सादर करावे.

१३) संस्थेकडे शुल्क परतावा व मुळ कागदपत्रे परताव्याबाबत संस्थेकडे कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र प्राचार्यांच्या स्वाक्षरीने सादर करावे.

**१४) अल्पसंख्यांक दर्जाच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्यांक विभागाने प्रदान केलेल्या शासन निर्णय क्र. अविवि-२०१०/प्र.क्र.१०९/१०/कार्या-५, दिनांक -०१ जुलै २०१३ नुसार, अल्पसंख्याक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याच्या वैध कालावधीची पडताळणी काटेकोरपणे करण्यात यावी.**

१५) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ दि. १७/८/२०१५ रोजी अस्तित्वात आला असून त्यामध्ये उशीरा प्रवेशित उमेदवारांची माहिती उशिरा अपलोड करणे, मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे अशी प्रकरणे नियमीत करण्याची तरतूद नाही. त्यामुळे अशी प्रकरणे कोणत्याही सबबीवर मान्य करता येणार नाही व सदर प्रवेश रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१६) प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश यादी सादर करण्यासाठी संस्थेने विहित दिनांकापर्यंत विभागीय कार्यालयात प्रवेश यादी सादर करणे आवश्यक आहे याबाबत नोंद घ्यावी.

१७) मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी पावती सादर करुन प्रवेश देण्यात आलेले होते अशा प्रकरणी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेवून त्याप्रमाणे कागदपत्रे सादर करावी.

१८) प्रवेश यादी मंजूर झाल्यास त्यामध्ये नियमबाहय प्रवेश अथवा अनियमितता झाल्याचे आढळून आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील, याची व्यक्तीशः नोंद घ्यावी.

१९) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३०/११/२०२६ पर्यंत गुणवत्ता याद्या आवश्यक कागदपत्रासह या कार्यालयास सादर कराव्यात. जेणे करून सदर गुणवत्ता याद्या तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई व त्यांच्या मार्फत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे वेळवर सादर करणे शक्य होईल, याबाबत संस्थाप्रमुखाने कटाक्षाने नोंद घ्यावी.

२०) गुणवत्ता यादी पडताळणीसाठी सादर करतांना संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या माहिती पुस्तिकेची प्रत तपासणी अधिकाऱ्याला उपलब्ध करून द्यावी.

२१) एखाद्या विशिष्ट प्रकरणी मा. सर्वोच्च वा मा. उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले असल्यास त्यानुसार ते प्रकरण तपासावे.

२२) यासोबत जोडलेल्या यादीमध्ये काही संस्था अनावधानाने राहून गेल्या असल्यास अशा संस्थांनी तात्काळ कार्यालयाशी संपर्क साधावा.

२३) गुणवत्ता यादीची पडताळणी सुटसुटीत व्हावी यादृष्टीकोनातून संस्था प्रमुखांनी आपल्या स्तरावर प्रत्येक कागदपत्राची पडताळणी करून घ्यावी.

२४) पडताळणी करतांना उमेदवाराचा प्रवेश रद्द केला असल्यास संचालनालयाच्या संकेतस्थळावर संस्थेच्या Login मधून Online पद्धतीने अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करून त्यानंतर गुणवत्ता यादीची Printout सादर करावी.

२५) संस्थांनी दिलेली कालमर्यादा कटाक्षाने पाळावी.

**२६) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या मूळ प्रती (टि.सी. वगळता) विद्यार्थ्यांना नियमानुसार परत केल्याचे प्राचार्याचे प्रमाणपत्र व त्याबाबतचा विद्यार्थ्यांच्या स्वाक्षरीसह अहवाल.**

**२७) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेल्या शुल्काची विद्यार्थीनिहाय एकत्रित यादी (प्राचार्यांनी प्रमाणित केलेली प्रत).**

प्रवेश यादी मंजूर झाल्यानंतर त्यामध्ये नियमबाहय प्रवेश अथवा अनियमितता झाल्याचे आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखाची राहील याची व्यक्तीशः नोंद घ्यावी.

सोबत :- वेळापत्रकाची प्रत.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :-
१. प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.
२. प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित प्रथम वर्षे औषधनिर्माणशास्त्र पदवी /पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था, अमरावती विभाग, अमरावती.

त्यांना सुचित करण्यांत येते कि, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादया तीन प्रतीत तयार करून **शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,अमरावती** नियुक्त केलेल्या तपासणी अधिकाऱ्यांशी संपर्क साधून ऑफलाईन व ऑनलाईन गुणवत्ता यादया तपासणीचे काम वरील पत्रात दिलेल्या सूचनेप्रमाणे व वेळापत्रकानुसार दिलेल्या मुदतीच्या आत त्वरीत पूर्ण करून घ्यावे. सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात योग्य ती माहिती प्रत्येक गुणवत्त यादयासोबत जोडावयाची आहे. गुणवत्ता याद्या तयार करण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास तात्काळ या कार्यालयास संपर्क करावा. तसेच गुणवत्ता यादयांची सोबतच्या दिलेल्या प्रपत्राप्रमाणे तपासणी करून घेण्याबाबत दक्षता घ्यावी. गुणवत्ता यादी तपासणीकरिता आवश्यक सर्व मूळ कागदपत्रासह आपल्या कार्यालयातील जाणकार प्राध्यापक कर्मचारी यांना संबंधित संस्थेत प्रतिनियुक्त करावे. **शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,अमरावती** तपासून आल्यानंतर संस्थांनी या कार्यालयाशी संपर्क साधावा व या विभागीय कार्यालयाने प्रमाणित केलेली यादी प्रवेश नियामक प्राधिकरण यांना सादर करावयाची आहे. तेव्हा दिलेल्या मुदतीत या कार्यालयास उपरोक्त प्रमाणे तपासणी अधिकाऱ्याकडून तपासून ही शिक्क्यानिशी प्रमाणित करून दिलेल्या मुदतीत गुणवत्ता याद्या या कार्यालयास सादर कराव्यात. याबाबतची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील, याची नोंद घ्यावी. **सोबत जोडलेल्या यादीमध्ये एखाद्या संस्थेचे नाव समाविष्ट नसल्यास तसे या कार्यालयाशी त्वरीत संपर्क साधावा.**

# गुणवत्ता याद्या तपासणी स्थळ :- शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,अमरावती

शैक्षणिक वर्ष 2026-27 करीता प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची गुणवत्ता यादी (Merit List) तपासणी अधिकारी यांच्याकडून तपासून घेणे आवश्यक आहे. या तपासणीसाठी नियुक्त केलेल्या तपासणी अधिकाऱ्यांना सदर तपासणी अधिकाऱ्यांशी संपर्क साधून दिनांक २५/११/२०२६ पूर्वी गुणवत्ता यादीची तपासणी पूर्ण करून घ्यावी.तसेच, तपासणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर गुणवत्ता यादी दिनांक २७/११/२०२६ पर्यंत सहसंचालक कार्यालयात जमा करण्यात यावी.

| Sr No | Name of Institute | Name of Skrutini Officer | Contact No. |
|---|---|---|---|
| | **Akola** | | |
| 1 | **01135 - Shri Gurudatta Shikshan Prasarak Sanstha's Institute of Pharmacy, Kaulkhad, Akola** | Dr.N.R.Kotgale | 9960099615 |
| 2 | **01304 - Mahatma Phule Pharmacy College, Babhulgaon Dist. Akola** | | |
| 3 | **01311 - Late Shri. S. B Purushottam College of Pharmacy, Patur, Dist-Akola** | | |
| | **Amravati** | | |
| 4 | **01003 - Government College of Pharmacy, Amravati** | | |
| 5 | **01131 - Vidya Bharati College of Pharmacy, Amravati** | Dr.S.L.Devare | 9766577646 |
| 6 | **01164 - Shree, Swami Samarth Institute of Pharmacy, at parsodi, Dhamangaon Rly, Dist.Amravati** | | |
| 7 | **01283 - P R Pote Patil College of Pharmacy, Amravati** | | |
| 8 | **01284 - Dr. Rajendra Gode Institute of Pharmacy, Amravati** | | |
| 9 | **01286 - Institute of Pharmacy & Research, Badnera** | Dr. A.R.Kharat | 7020726010 |
| 10 | **01296 - Dr. Rajendra Gode College Of Pharmacy, Amravati** | | |
| 11 | **01297 - Vidyaniketan College Of Pharmacy, Anjangaon Surji** | | |
| | **Buldhana** | | |
| 12 | **01133 - Anuradha College Of Pharmacy, Chikhli** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | 01136 - Dr. Rajendra Gode College of Pharmacy,Malkapur | Dr.K.S.Patil | 9421918049 |
| 14 | 01158 - Paramhansa Ramkrishna Maunibaba Shikshan Santha's Anuradha College of Pharmacy, Chikhali | | |
| 15 | 01161 - Matoshri Education Society's Satyajeet College of Pharmacy, Khandala, Akola Road Mehkar, Tq. Mehkar, Dist. Buldhana | | |
| 16 | 01271 - Rajarshi Shahu College of Pharmacy, Buldhana | Prof.D.S.Ghorpade | 9422157418 |
| 17 | 01280 - Gawande College of Pharmacy, Sakharkherda | | |
| 18 | 01282 - Laddhad College of Pharmacy, Yelgaon, Buldhana | | |
| 19 | 01285 - MES College of Pharmacy, Mehkar | | |
| 20 | 01291 - Shri. Sant Gajanan Maharaj College Of Pharmacy, Buldhana | Dr.P.R.Patil | 9765593900 |
| 21 | 01292 - Dr.R.N.Lahoti Institute Of Pharmaceutical Education And Research Center, Sultanpur | | |
| 22 | 01294 - Samarth College Of Pharmacy, Deulgaon Raja | | |
| 23 | 01295 - Karmayogi Tatyasaheb Bondre Institute Of Pharmacy, Chikhli | Dr.M.A.Shende | 9423671499 |
| 24 | 01299 - NK College of Pharmacy, Antraj Khamgaon | | |
| 25 | 01303 - Satpuda Institute of Pharmacy, Shegaon | | |
| 26 | 01305 - Cambridge College of Pharmacy, Yelgaon Dist. Buldhana | | |
| 27 | 01306 - Rajashri College of Pharmacy | Dr. B.A.Baviskar | 9766577647 |
| 28 | 01345 - Late. Sushilabai Jaiswal College of Pharmacy, Ramgaon | | |
| | **Washim** | | |
| 29 | 01264 - Vidarbha Institute of Pharmacy, Washim | | |
| 30 | 01270 - MUP's College of Pharmacy (B. Pharm), Degaon Tq. Risod Dist. Washim | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 31 | 01281 - Takshashila Institute of Pharmaceutical Education And Research | Dr.D.P.Pawar | 8378982425 |
| 32 | 01288 - Vardhaman College of Pharmacy, Karanja (LAD), Washim | | |
| 33 | 01293 - Shraddha Institute Of Pharmacy, Washim | | |
| 34 | 01301 - Mauli Institute of Pharmacy & Research Centre, Washim | | |
| **Yavatmal** | | | |
| 35 | 01115 - J.S.P Mandal's Sudhakarrao Naik Institute of Pharmacy, Pusad Dist. Yavatmal | | |
| 36 | 01134 - Yavatmal Zilla Vikas Samitee's Pataldhamal Wadhwani College of Pharmacy, Yavatmal | Dr.Y.P.Agrawal | 9423720983 |
| 37 | 01157 - Shri Chhatrapati Shahumaharaj Shikshan Santha's Institute Of Pharmacy, Maregaon | | |
| 38 | 01159 - Navsanjivan Shikshan Mandal's College of Pharmacy, Dharwa | | |
| 39 | 01160 - Shri.Durgamata Bahuudeshiya Krida and Shaikshanik Sanstha,Ishwar Deshmukh Institute Of Pharmacy, Digras | | |
| 40 | 01171 - Pataldhamal Wadhwani College of Pharmacy, Yavatmal | Dr.M.Y.Agrawal | 9423720953 |
| 41 | 01290 - Jagadambha Institute Of Pharmacy And Research, Kalamb | | |
| 42 | 01307 - Sushganga College of Pharmacy Wani | | |
| 43 | 01343 - Savitridevi College of Pharmacy Wani | | |

i/c Joint Director
Technical Education
Amravati

## शैक्षणिक वर्ष 2026-27 गुणवत्ता यादीतील त्रुटया दर्शविणारे विवरणपत्र

संस्थेचे नाव:-

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव (प्रथम वर्ष/व्दितीय वर्ष/ व शाखा स्पष्ट नमूद करावी ) | CAP/ACAP/ILअसे नमूद करावे | यादीतील अ.क्र. | त्रुटि |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No :** (0721) 2573027, 2572577
**Website:** www.jdroamt.org
**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in
**Fax No:** (0721) 2577913


क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२६/
दिनांक :-

## :- प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/ गु यादी/ २०२६/------------, दि.----------- तसेच प्राचार्य, ______________ ________________, ____________________ यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक ______________________________________ नुसार (संस्थेचे नांव)__________________________________________ या संस्थेच्या **प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदव्युत्तर पदवी** या अभ्यासक्रमास पदवी अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता महाराष्ट्र शासनाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रिया (CAP) / संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेऊन संस्थेकडे अर्ज व अर्जासोबत जोडलेली विद्यार्थ्याची प्रमाणपत्रे सादर केली आहेत, त्या सर्व अर्ज व प्रमाणपत्रांची शासनाचे नियम व प्रवेश नियमावलीनुसार तपासणी करुन गुणवत्ता यादी तपासली आहे. ज्या उमेदवारांच्या बाबतीत त्रूटी आढळल्या त्यांचे बाबतीत सुस्पष्ट अभिप्राय सर्वसामान्य गुणवत्ता यादीत तथा स्वतंत्र त्रूटी पत्रावर नमूद केल्या आहेत. तसेच प्रवेश यादीत असलेल्या प्रत्येक उमेदवाराचे नांव गुणवत्ता यादीत असल्याची खात्री करुन घेतली आहे.

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website:** www.jdroamt.org

**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No:** (0721) 2577913


अत्यंत महत्वाचे

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२६/

दिनांक :-

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती
## प्रपत्र -

| संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | भरलेल्या जागा | रिक्त जागा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

प्राचार्यांची स्वाक्षरी

शिक्का

तपासणी अधिकारी स्वाक्षरी

नांव:-

पदनाम :

संस्था :

**शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्यांसोबत सादर करावयाची व तपासणी अधिकाऱ्यांनी तपासावयाची कागदपत्रे.**

| अ.क्र | आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे | साक्षांकित छायांकित प्रत उपलब्ध आहे / नाही. | तपासणी अधिका-यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली,, शासन मान्यता, विद्यापिठाचे सलग्नीकरण यांचे मान्यता पत्र आहे किंवा नाही. | | |
| २ | संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे मान्यता पत्र आहे किंवा नाही, ते स्पष्टपणे नमुद करावे. | | |
| ३ | संस्थांनी नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी नियुक्ती, यंत्रसामुग्री व अद्ययावत प्रयोगशाळा, ग्रथालय सुविधा विद्यार्थ्यांना देत असल्याबाबत हमिपत्र सादर केले किंवा नाही. | | |
| ४ | संस्था स्तरावर प्रवेश फेरीकरीता वर्तमानपत्रात जाहिरात दिल्याची प्रत जोडली किंवा नाही. | | |
| ५ | सांखिकी माहिती विहीत प्रपत्रात आहे किंवा नाही. | | |
| ६ | संस्थेत प्राचार्याचे नियमीत पद भरले आहेत किंवा नाही, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीबाबत तसेच इतर बाबतीत तक्रारी नाहीत याबाबत स्पष्टीकरण. | | |
| ७ | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्यात येते किंवा कसे याबाबतचे प्रमाणपत्र | | |
| ८ | रॅगिंग प्रतिबंधक समिती तसेच रंगींग प्रतिबंधकबाबत संस्थेतर्फे वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली आहे काय.. | | |
| ९ | मागासवर्गीय उमेदवाराकडून शासन निर्णयाप्रमाणे/संचालनालयाच्या आदेशाप्रमाणे शुल्क आकारण्याबाबतची कार्यवाही केली किंवा कसे? | | |
| ११ | शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थानी वर्षाकरीता मुदतठेवीचा दुसरा हप्ता तसेच इतर मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई व संस्था अध्यक्ष यांचे संयुक्त ठेव खात्यात जमा केले किंवा नाही . | | |

प्राचार्यांची स्वाक्षरी
नांव:-
शिक्का

तपासणी अधिकारी स्वाक्षरी
नांव:-
पदनाम :
संस्था :